# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:29.05.2026** **वारः शुक्रवार**

---

1. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी, तसंच अवैध स्थलांतर पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी सरकार वचनबद्ध – गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
2. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांचा राजीनामा
3. प्रख्यात उर्दू शायर बशीर बद्र यांचं निधन आणि
4. आय पी एल क्रिकेट स्पर्धेच्या, पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात, आज, गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामना रंगणार

**अमित शहा**

देशातील प्रत्येक घुसखोराला शोधून काढून हद्दपार करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे असा पुनरुच्चार केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केला आहे. शहा तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. गांधीनगर लोकसभा मतदारसंघात 340 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकाल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन काल त्यांच्या हस्ते झालं; त्यानंतर घेतलेल्या जाहीर सभेत शहा बोलत होते. ते म्हणाले....

**घुसपैठिए को देश के बाहर निकालना ये हमारी सरकार का संकल्प है, और इसके लिए नरेन्द्र मोदी जी ने एक डेमोग्राफी चेंज कमीशन कमेटी बनाने का निर्णय किया है। ये हाई पावर कमेटी देश भर में जनसांख्यिकी का जो कृत्रिम बदलाव हुआ है, उसके कारणों और उपायों की भी चिंता करेगी और इसके लिए कोई कानून बनाने की जरूरत है। तो इसकी भी चिंता करे।**

भाजपा प्रणीत, नवनिर्वाचित पश्चिम बंगाल सरकारने, सत्तेवर आल्यानंतर एका आठवड्याच्या आत, सीमेवर कुंपण घालण्यासाठी  सीमा सुरक्षा बलाला 600 हेक्टर जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी पश्चिम बंगाल सरकारची प्रशंसा केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची काल जयंती होती. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी, सावरकरांच्या अतुल्य देशभक्तीचं आणि त्यांनी केलेल्या त्यागाचं स्मरण करत त्यांना आदरांजली वाहिली. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज, कच्छमधील आंतरराष्ट्रीय सीमेला लागून असलेल्या आणि सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील अशा, 'हरामी नाला' आणि खाडी क्षेत्राला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान, ते सीमा सुरक्षा दलानेकेलेल्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतील

**पंतप्रधान-आदिवासी सुरक्षा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत, 'आदिवासी सुरक्षा मंच'च्या प्रतिनिधींची भेट घेतली. आदिवासी समाजाप्रती, या मंचाचे प्रतिनिधि, समर्पण भावनेनं करत असलेलं काम खरोखरच कौतुकास्पद आहे,

असं पंतप्रधानांनी आपल्या समाजमध्यमांवरील संदेशांत नमूद केलं. या भेटीदरम्यान आदिवासी समाजाचा विकास आणि त्यांच्या सक्षमीकरणाशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

**<u>पंतप्रधान-मुख्यमंत्री भेट</u>**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली. राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली, तसंच, विविध विषयांवर पंतप्रधानांचं मार्गदर्शन घेतलं. पंतप्रधानांची भेट नेहमीच प्रेरणादायी आणि ऊर्जा देणारी असते अशी भावना फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली.

**<u>तांदूळ उत्पादन-चौहान</u>**

चीनला मागे टाकत, भारताने, जगातील तांदळाचा सर्वात मोठा उत्पादक देश होण्याचा मान मिळवला आहे असं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल केलं. ते काल नवी दिल्लीत, खरीप अभियान 2026 या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. देशातील कष्टाळू शेतकऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे देशात अन्नसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे, असं नमूद करत, या वर्षी देशातील अन्नधान्याचं अंदाजित उत्पादन 376 दशलक्ष टनांहून अधिक आहे, ते, गेल्या वर्षाच्या तुलनेत 5 टक्क्यांनी जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>सीबीएसई-पुनर्मूल्यांकन</u>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई च्या इयत्ता 12 च्या परीक्षा मूल्यांकन प्रक्रियेसंदर्भात काही त्रुटी समोर आल्यानंतर आता पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल नवी दिल्लीत दिली. सीबीएसई अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीनंतर प्रधान प्रसारमाध्यमांशी बोलत होते. कोणत्याही विद्यार्थ्याच्या शंका अनुत्तरित राहणार नाहीत आणि सर्व स्तरांवर उत्तरदायित्व सुनिश्चित केलं जाईल. आपण त्रुटींची जबाबदारी स्वीकारत असून या त्रुटी दूर केल्या जातील आणि योग्य तोडगा काढला जाईल, असं प्रधान म्हणाले. ऑन-स्क्रीन मार्किंग ही प्रणाली सीबीएसईनं देशात प्रथमच लागू केली असून, या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन केलेल्या प्रती थेट पाहता येतील असं त्यांनी सांगितलं.

**<u>सिद्दरामय्या राजीनामा</u>**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी काल, मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. कर्नाटकचे भावी मुख्यमंत्री म्हणून डी. के. शिवकुमार यांचं नाव चर्चेत आहे. सिद्दरामय्या यांनी सर्वाधिक काळ कर्नाटकचं मुख्यमंत्रीपद भूषवलं आहे.

**<u>डोभाल-रशिया</u>**

राष्ट्रीय सुरक्षासल्लागार अजित डोभाल यांनी दहशतवादाविरोधात निर्णायक कारवाई करण्याची गरज व्यक्तकेली असून, दहशतवादाविरुद्धच्या लढाईत दुटप्पी भूमिका असता कामा नये असं देखील म्हटलंआहे. रशियात मॉस्को इथं आयोजित आंतरराष्ट्रीय सुरक्षा मंचाच्या बैठकीला ते संबोधित करत होते. जबाबदार देशांनी

आपल्या निवडीचं पुनरावलोकन करणं आवश्यक असून दहशतवादालापाठबळ पुरवणाऱ्यांना पाठिंबा द्यायचा की त्यांच्याविरुद्ध निर्णायक कारवाई करायचीहे त्यांनी आता ठरवलं पाहिजे, असंही डोभाल म्हणाले.

**<u>आयआरजीसी हल्ला</u>**

अमेरिकेनं इराणच्या दक्षिण भागात अलीकडेच केलेल्या हवाई हल्ल्यानंतर कुवेतमधील अमेरिकेच्या तळाला आपण लक्ष्य केल्याचं इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात IRGC नं म्हटलं आहे. मात्र शत्रूची क्षेपणास्त्रं आणि ड्रोन परतवून लावण्यात आल्याचं कुवेतकडून सांगण्यात आलं. अमेरिकेनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून जाणारी ड्रोन्स पाडल्यानंतर तसंच दक्षिण इराणमधील बंदर अब्बास लष्करी ठाण्याला लक्ष्य केल्यानंतर इराणनं हे क्षेपणास्त्रं हल्ले केले.

**<u>बकरीईद</u>**

ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईदचा सण धार्मिक उत्साह, श्रद्धा आणि बंधुभावाच्या वातावरणात काल देशभरात साजरा करण्यात आला. इदगाह आणि मशिदींमधून मुस्लीम बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली.

**<u>भाजपा प्रदेशाध्यक्ष नियुक्ती</u>**

भारतीय जनता पक्षाने पंजाब, हरयाणा, दिल्ली आणि त्रिपुरा साठी नवीन प्रदेशाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी या नियुक्त्याची काल नवी दिल्लीत घोषणा केली. यानुसार, केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा यांची दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष म्हणून, अर्चना गुप्ता यांची हरयाणा, केवलसिंह धील्लोन यांची पंजाब आणि अभिषेक देबरॉय यांची त्रिपुराच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>दिलीप मोंडाल-कोठडी</u>**

पश्चिम बंगालचे माजी मंत्री, आणि दक्षिण 24 परगणा जिल्ह्यातील बिष्णुपूरविधानसभा मतदारसंघातील तृणमूल कॉंग्रेसचे  आमदार दिलीप मोंडाल यांना कोलकात्यातील कनिष्ठ न्यायालयाने काल 10 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. नुकत्याच पार पडलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदारांना धमकावल्याच्या कथित आरोपांशी संबंधित अनेक गुन्हे दाखल आहेत.

**<u>एनडीए</u>**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ आज पुण्यातल्या खडकवसला इथं होणार आहे. निवृत्त आयपीएस अधिकारी डॉक्टर किरण बेदी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. 150व्या तुकडीचं दीक्षांत संचलन उद्या लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत एनडीएच्या खेत्रपाल मैदानावर होणार आहे. या सोहळ्यात भारतीय हवाई दलाकडून नेत्रदीपक हवाई प्रात्यक्षिकं सादर केली जाणार आहेत. दीक्षांत संचलनापूर्वीची रंगीत तालीम काल उत्साहात पार पडली.

**<u>बशीरबद्र-निधन</u>**

प्रख्यात शायर बशीर बद्र यांचं काल भोपाळमध्ये वृद्धापकाळानं निधन झालं. ते 91 वर्षांचे होते. उर्दू शायरीला एक नवी ओळख बद्र यांनी दिली. सामान्य माणसाच्या मनाला भावतील, भिडतील अशी साधी सोपी रचना हे बद्र यांच्या शायरीचं वैशिष्ट्य होतं. त्यांच्या शेर तसंच गझलांमधून प्रेम, एकाकीपणा, मानवी नातेसंबंध आणि दैनंदिन जीवनाचे चित्रण उमटत असे. 'उजाले अपनी यादोंके' हा त्यांचा गझल संग्रह विशेष गाजला. अलीगढ

मुस्लिम विद्यापीठातून त्यांनी आपलं पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर 1990 पर्यंत त्यांनी मेरठ महाविद्यालयातील उर्दू विभागात व्याख्याता आणि अध्यापक म्हणूंन कार्य केलं. बद्र यांना पद्मश्री बरोबरच संगीत नाटक अकादमी सन्मानानं गौरवण्यात आलं होतं. त्यांच्या 'आस' या संग्रहाला उर्दू भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

**<u>आय पी एल</u>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत, पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात, आज, गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामना रंगणार आहे. चंदीगढ मधील महाराजा यादविन्द्र सिंह मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने गुजरात टायटन्स संघाचा पराभव केला होता.

**<u>हवामान</u>**

दिल्ली, हरयाणा आणि चंदीगढ राज्यात आज वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. केरळममध्येही जोरदार पावसाचा अंदाज आहे. महाराष्ट्रातील विदर्भ, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, मध्य प्रदेश उष्णतेची लाट येण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.